International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
May 2014
Issue-II, Volume-II
Online Journal
ISSN No. 2347-8268

# स्त्री शिक्षणाने महिला सबलीकरण शक्य...

**वंदना एन. वैद्य**
**कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तुकूम, चंद्रपूर.**

स्त्री शिक्षणाने महीला सबलीकरण शक्य—शब्द अवघड वाटला तरी सक्षमीकरणाच्या सोपा आहे अर्थ, पुरूषातील कोमल स्त्री जागवा आणि स्त्री मधील पुरुषार्थ।।

स्त्रीयांचे सबलीकरण म्हणजेच तिचे सक्षमीकरण करणे होय. याचाच अर्थ स्त्रीयांचा कमकुवतपणा परावलंबीत्व आणि स्त्री अबला आहे हे मान्य करणे होय. स्त्रीयांचे अध्यात्मिक, सात्विक, आर्थिक, राजकिय सामर्थ्य वाढविणे आणि त्यांचा आत्मविश्वास त्यांना पुन्हा मिळवून देणे म्हणजेच महिलांचे सबलीकरण करणे होय. स्त्रीयांतील विविध क्षमतांचा विकास करणे, त्यांना त्यांच्या स्वकर्तृत्वाने पायावर उभे राहण्यास तयार करणे, आर्थिक दृष्ट्या सक्षम राहणे, स्वावलंबी करणे, दृढ निर्णय घेणे, त्यांच्या निर्णयक्षमतेत वाढ करणे, त्यांच्यात सकारात्मक व्यक्तीमत्व निर्माण करणे, त्यांच्यातील नकारात्मक बाजुंवर ताबा मिळविणे या सर्व बाबी महिला सबलीकरणात येतात.

वैदिक काळात अनेक स्त्रीयांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले यात मैत्रीय, गार्गी, राणी लक्ष्मीबाई, माता जिजाऊ अश्या अनेक स्त्री व्यक्तीमत्वाचा उल्लेख येतो. अश्मयुगातही स्त्री ही शिकारी साठी जात असे असा उल्लेख इतिहासात आढळतो. शेतीत बी पेरून अन्न उत्पादन करण्यासाठी शेतीचा शोध स्त्रीयांनीच लावला. म्हणुन स्त्रीला आदिमाता, अन्नपुर्णा या नावानेही संबोधिले जाते. त्याकाळी स्त्रीयांना पुरूषा इतकेच महत्व होते. धार्मिक कार्यापासून तर मोठमोठ्या सभा गाजविण्यात स्त्रीयांचा मोठा सहभाग होता. त्यांचा सिंहाचा वाटा होता.

मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेत स्त्री अबला ठरली. पुरूषांनी जनानखाने बळगावल्याने स्त्रीया हतबलं आणि परावलंबी ठरल्या. स्त्रीकडे फक्त उपभोग्य वस्तु म्हणुनच बघितल्या जावु लागले. पुरूषापेक्षा स्त्रीला दुय्यम स्थान देऊ जावु लागले. स्त्रीचे फक्त चुल आणि मुलं हेच विश्व झाले.

यज्ञाच्यावेळी धार्मिक विधीतला सहभाग नगरवधु, गणिका, देवदासी, मुरळी भावीन अश्या अनेक कपात स्त्री दिसु लागली सगळीकडे स्त्री ही शोषितस्वरुपात वावरु लागली. स्त्रीयांचे स्वातंत्र्य हिरावल्या गेले. तिचे समाजात असलेले स्थान लावल्या गेले. स्त्री ही खरोखरचं अबला झाली खरं तर कित्येक कार्यकुशल महिलांनी या देशात सामाजिक


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

क्रांती घडविली. देवापेक्षाही किंबहुना ईश्वराइतकेच महत्व स्त्रीयांना एकेकाळी देण्यात आले होते.

''यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्व देवता''

अस म्हणणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीनेच ''न स्त्री स्वतंत्रम अहर्तता' असेही मानले.

स्त्री—पुरुष ही संसाररथाची दोन चाके असं आपण म्हणत असू तर दोनेही चाके शक्ती, कार्यक्षमता, गती सारख्याच क्षमतेची असायला नको कां? समाजातील विकासात कारणीभूत असलेली स्त्री—पुरुष शक्ती ही एकसमान, एकविचारी असायला हवी. शिक्षण हे ह्या विकासातील महत्वाचे साधन ठरले. स्त्रीयांनी शिकावे तरचं समाज शिकेल सुधारेल असे पुरोगामी विचार रूढ व्हायला लागला.

१९९२ मध्ये महीला आयोगाची स्थापना झाली. केंद्र शासनाने २००१ मध्ये महीला सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे अनेक सुधारणावादी चळवळीची सुरूवात महाराष्ट्रात झाली. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात पायाभरणीचे कार्य करणाऱ्या महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या सारख्या समाजसुधारकांनी जन्मभुमी आणि कर्मभूमी ही महाराष्ट्रात आहे. घटनेने महीलांना दिलेला समान हक्क आणि समानतेच्या हक्कांची अंमलबजावणी करणे, महीलेचा सामाजिक दर्जा उंचावते, स्त्रीयांना संरक्षण देणे, विकासाच्या महिलांसाठीच्या विविध योजना सोयी, सवलती पुरवणे यासाठी जुन १९९४ मध्ये महीला धोरण जाहीर केले अन् तिथुनच महीला सक्षमीकरणाच्या प्रयत्नास सुरवात झाली.

स्त्रियांना दुय्यम स्थान म्हणजे विकासात अडसर ही वास्तविकता समाजाला कळल्यामुळेच स्त्रीयांना शिक्षीत करणे ,पुरूषांबरोबरीने स्थन देणे, आर्थिक द्दष्टया स्वावलंबी बनविने स्त्रियांवरिल अन्यायाचे परिमार्जन करणे, स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा आणि सन्मान अश्या अनेक सुधारणा करण्यात आपल्यात महिलांना जास्तीत जास्त सक्षम बनविण्या करिता राज्य शासनाने महिलांना प्रशिक्षण, रोजगार, विविध सहाय्यता कार्यक्रम, स्वाधार, स्वशक्ती, बालीका समृध्दी योजना, कुटूंब सेवा केंद्र, महिलांसाठी विविध महाविद्यालय, राखीव जागा, विनामुल्य शिक्षण, शाळांमधून मुलींसाठीच्या विविध सोयी, सवलती, पुरस्कार भेटी, शिष्यवृत्ती वैगरे अश्या अनेक नियम व अटी तयार करून समाजातील महिलांचे स्थान मानाचे बनण्यास राष्ट्रीय पातळीवरून सुरुवात झाली.

सावित्रीबाई दत्तक योजना, अहिल्यादेवी होळकर योजना, देवदासी पुनर्वसन योजना, महिला मंडळांना सहाय्यक अनुदान योजना, बेटी—रोटी योजना, सुवर्ण कन्या योजना, सरकारी नौकरीत ३०टक्के आरक्षण योजना, शाळा—महाविद्यालयातील कागदपत्रांच्या नोंदीत आईच्या नावाचा उल्लेख अनिवार्य झाला आहे. घरगुती हिंसाचार कायदा आणि स्त्रीभ्रृण हत्या बंदी विधेयक असे कडक कायदे ही करण्यात आले आहे. बांग्लादेशात डॉ. युनुस अंहमद यांनी सुरु केलेली 'महिला स्वयंसहाय्यता बचत गट चळवळ' आज भारतातील ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात रुजली आहे. बचत गटाचा वटवृक्ष होऊन प्रचंड मोठ्या प्रमाणावर त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारले आहे. आर्थिक स्वावलंबन आणि त्यातून राष्ट्रीय उत्पन्नात भर असा मार्ग महिलांनी महिलांसाठी तयार केला आहे. महिलांच्या सबलीकरणातील हा बचत गटाचा मार्ग जास्त सुकर ठरला आहे. ह्यातून ''मी माझं'' ही भावना लुप्त होवून 'आम्ही मिळून साऱ्या जणी' हा नवा संघटीत विचार एकत्रीत येत आहे.

महिलांना राजकीय अस्तित्व प्राप्त झाले म्हणजे ती सबला झाली असे मुळीच नाही. जोवर पुरुषप्रधान संस्कृती महिलांचे अनण्यसाधारण मानत नाही. तोवर महिला सक्षमीकरण होणे शक्य नाही. आजही ग्रामीण भागातील महिला ''अबला'' दिसतेच. विविध पदे दिल्याने महिला सक्षमीकरण होणार नाही तर कुटूंबातील पुरुषांची मानसिकता त्याट्टटीने बदलणे गरजेचे आहे.

आपण ८ मार्च जागतिक महीला दिन साजरा करतो. स्त्रियांची महती सुशिक्षीत भाग आजही वैचारीक द्रृष्टया स्त्रियांच्या अस्तित्वाबद्दल मागासलेला आहे. पुरूषांपेक्षा जास्त शारीरिक श्रम करणाऱ्या महिलांना अनेक बंधने आणि शोषितांचे जीवन जगावे लागते. म्हणूनच ग्रामीण निराधार स्त्रियांसाठी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबन हा विचार पुढे आला स्त्री कितीही पुढे गेली, कितीही शिकली तरी काही पारंपारिक रुढी परंपरा जशास तशाच आहेत. घर नौकरी आणि संगोपन या तिनिही भूमिका आजही स्त्रीयांना निभवाव्या लागतात.

स्त्री ही हृद्‌य स्वामीनी आहे, गृहस्वामिनी आहेत, मुलींची तर ती आदर्श आहे, घरातील कर्तव्य दक्ष सुन आहे घराबाहेर मॅड्‌म आहे, अशा स्त्रीला तिचे प्रकाश गाणे गावयास निश्चितच बळ मिळेल, इतिहासाची पाने उल्घडुन पाहीली की, स्त्री यांच्यातील शक्तीची जाणीव नव्याने झाली. ती राणी लक्ष्मीच्या रूपाने अवतरलेली म्हैशाशुर मर्दीनी असेल, अहिल्यादेवीच्या रूपाने अवतरलेली जगत अंबा असेल, सावित्रीबाईच्या रूपाने अवतरलेल्या सरस्वती शारदा असेल नाही तर बहिणाबाईच्या रूपाने अवतरलेल्या मात्र सरस्वती असतील.

अगदी अलीकडच्या काळात जर वळून पाहिले तर भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी फक्त भारतातच नवे तर संपूर्ण जगात आपलं वेगळं दबदबा निर्माण केला. साऱ्या विश्वावर स्वरांची मोहिनी घालणाऱ्या लता मंगेशकर तर भारताच्या सर्वोच्च मानाचे राष्ट्रपती पद श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी भुषविले या सर्वांना प्रणिपात.।

वरील या सर्व स्त्री शक्तीचे प्रखर स्वरूप आपल्या समोर येतं; त्यांच्या कर्तृत्वाने आपले डोळे दिपून जातात. क्षणभर त्या तेजाने आपण भोळवंडुन जातो. ते इतके प्रखर की झाशीच्या राणीव, सुर्याची पाकडी म्हणजे आहे. त्या चार ओळींची आठवण होते.....
...

''थांब जरा भारतवासी, या वृंदावनि लाव निरंजन
याच चिऱ्यांच्या तळी।
अर्पुनि जीवन मायधरेला जळता जळता मालवली ती सुर्याची पाकळी।।.

आज २१ व्या शतकात असे एकही दोन नाही की ज्याठिकणी महिलेने आपले स्थान निर्माण केले नाही .भारतदेशातील शिक्षण व राजकारण क्षेत्रातील या महिलांनी आपल्या भावी पिढीसाठी आदर्श निर्माण केला आहे. बिंदुपासुन सुरवात करून आपल्या कार्यकर्तत्वाचा परिघ स्त्रियांनी दिवसेंदिवस विस्तारत नेला आहे. उज्ज्वल चारीत्र्याच्या निस्वार्थ, निर्भय सक्षम महीला निर्माण होईल त्यांना शतशः प्रणाम!

संदर्भ:

१) महीलांचे सबलीकरण आणि शेतकरी महील आघाडीचे योगदन
— डॉ.सौ.नंदीनी तडकलकर (चौधरी)

२) महीला कल्याण आणि विकास — कवि माधवी
— प्रमोद मुंजे प्रकाशन, नागपूर

३) स्त्री विकासाच्या पाऊलखुणा — स्वाती कर्वे
— प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४) स्त्रीया आणि कायदा, स्त्री आधार केंद्र, पुणे
— निलम गोऱ्हे

५) शिक्षण संक्रमण — मार्च २०००
६) दैनिक वृत्तपत्र ''दिव्य मराठी'' स्त्री शक्ती वरील लेख.